# विशाल

## १०:०५:१०

### दुय्यम अन्नद्रव्य युक्त भू-सुधारक

विशाल वापरल्याने जमिनीचा पोत, रचना व घन, आयन देवघेव क्षमता सुधारुन जमिनीचा अपेक्षित सामू कायम ठेवण्यास मदत होते. विशाल मधील अन्नद्रव्ये खालील प्रमाणे कार्य करतातः

**कॅल्शियम**: कॅल्शियम मुळे जमिनीची पाणी धारण करण्याची क्षमता वाढते. जमीन भुसभुशीत झाल्याने मुळांना आवश्यक अन्नद्रव्ये सहजतेने उपलब्ध होतात. मुळांची चांगली वाढ होवून अन्नद्रव्य शोषण क्षमतेत वाढ होते. क्षारयुक्त जमिनीत कॅल्शियमचा वापर उपयुक्त ठरतो. पोटॅशचा स्तर जमिनीत टिकवून ठेवण्यासाठी व त्याचे वहन करण्यासाठी कॅल्शियमची आवश्यकता असते.

**मॅग्नेशियम**: पिकांच्या पानांमधील हरितद्रव्य (क्लोरोफिल) निर्माण करण्यात मॅग्नेशियमची महत्वाची भुमिका असते. मॅग्नेशियम अभावी पाने पांढरी दिसतात व पानांच्या शिरांमध्ये पिवळसरपणा आढळतो. विशाल मधील मॅग्नेशियम या घटकामुळे पानांची निरोगी व जोमदार वाढ होते. वातावरणातून, सूर्यप्रकाशातून उपयुक्त घटकद्रव्ये शोषणास सहकार्य मिळते.

**सल्फर** : सल्फर मुळे पिकातील तेलाचे प्रमाण वाढते. सल्फर मुळे पानातील हिरवेपणा विकसित होतो. सल्फर मुळे दाण्याच्या आकारात वाढ होते. सल्फर हा तेल वर्गीय पिकांसाठी अत्यंत गरजेचा व लाभकारक घटक आहे.

**विशाल वापरण्याचे फायदे**: – जमिनीचा पोत सुधारुन जमीन भुसभुशीत होते. – जमिनीत हवा खेळती राहते. – जमिनीची पाणी धारण करण्याची क्षमता वाढते. – अन्नद्रव्ये मुळांच्या कक्षेत पोचविणास मदत होते. – जमिनीत वापरलेल्या नत्र, स्फुरद, पालाश खतांची उपयुक्तता वाढते. – मालाची प्रत जसे रंग, रुप, चव, आकारमान सुधारते. – जमिन आरोग्यपूर्ण व सुपीक ठेवण्यास मदत होते.

